ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख ७ सप्टेंबर, १९६० | अंक ३५

## विविध माहिती

**कुटुंबनियोजनाला प्रोत्साहन**—कुटुंबनियोजनाला प्रोत्साहन देण्याच्या हेतूनें गुजरात सरकारनें ५० हजार रुपये वाटण्याचें ठरविलें आहे. ही रक्कम कमी उत्पन्न असणाऱ्या व शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या स्त्रीपुरुषांत वाटली जाईल. ज्या स्त्रिया निर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रियेस तयार होतील त्यांना प्रत्येकीं ५ रुपये व पुरुषांना प्रत्येकीं २५ रुपये देण्यांत येतील. सुमारें २,२०० लोक शस्त्रक्रियेस तयार होण्याचा संभव आहे.

**खंबायतमधील तेल**—रशिआचे भारतामधील वकील मि. बेनेडिक्टॉव्ह ह्यांच्या अंदाजाप्रमाणें खंबायत भागांतील तेलाच्या विहिरींपासून भारताला १० कोटी टन अशुद्ध तेल मिळूं शकेल. खंबायत भागांत खोदण्यांत येणाऱ्या तेलविहिरींसाठी रशिआ यंत्रसामुग्री पुरविण्यास तयार असल्याचें त्यांनीं सांगितलें.

**कापडाच्या किंमतीबाबत मतभेद**—अखिल भारतीय गिरणी मालकसंघानें कापडाच्या किंमती उतरविण्याची घोषणा केली आहे. संघाच्या मतानें १९५९ च्या ऑगस्टमधील किंमती आधारभूत धरून किंमती उतरविण्याचा विचार व्हावा. पण सरकारच्या मतानें १९५९ च्या जुलैमधील किंमती विचारांत घेऊन ह्या प्रश्नाचा विचार व्हावा असें आहे. त्यामुळें किंमतींत फारसा फरक पडणार नाहीं.

**भारत-पाकिस्तान व्यापार**—भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान चालू असलेल्या व्यापारी वाटाघाटींत समाधानकारक प्रगति झाली आहे. भारत पाकिस्तानला सिमेंट, भारी वजनाची विजेची यंत्रसामुग्री, रेल्वेचें सामान, इत्यादि माल पुरविण्यास तयार आहे. पाकिस्ताननें आयात परवाने लवकर मिळण्याची तरतूद करावयाचें ठरविलें आहे.

**खताचा नवा कारखाना**—विझगापट्टम् येथें एक खताचा कारखाना काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीबाबत कांहीं भांडवलदारांनीं सरकारकडे विचारणा केली असून त्यांना आपआपल्या योजना सादर करण्यास सांगितलें आहे. कारखान्याची उत्पादनक्षमता, भांडवल, परदेशी सहकार्य, इत्यादि बाबतींत अद्याप कांहीं निर्णय घेण्यांत आलेला नाहीं.

**अणुशक्तीवरील वीजकेंद्राचा अनुभव**—भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उभारण्यांत यावयाच्या अणुशक्तीवरील वीजकेंद्राबाबत फ्रान्स, जपान, ब्रिटन व अमेरिका ह्या देशांकडून चवकशा करण्यांत येत आहे. अणुविज्ञानाच्या पुस्तकी ज्ञानांत भारतीय शास्त्रज्ञ अग्रावत् असले तरी त्यांना प्रत्यक्ष वीज-केंद्र उभारण्याचा प्रत्यक्ष अनुभव नाहीं, असें उत्तर पं. नेहरू ह्यांनीं लोकसभेंत दिलें.

**गव्हर्नरांची काटकसर**—आंध्र राज्याच्या गव्हर्नरांनीं गेल्या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं आपल्या खर्चांत काटकसर करण्याची घोषणा केली. तीस अनुसरून आतां त्या गव्हर्नरांच्या दौऱ्यांत गांवोगांवीं गुढ्यातोरणे उभारण्यांत येणार नाहींत, अगर त्यांच्या निवासस्थानावर विजेचे दिवेहि लावण्यांत येणार नाहींत. त्यांच्याबरोबर अगदीं जरूरीपुरतेच अधिकारी राहतील.

**सुपर पेनिसिलीनचा शोध**—कांहीं ब्रिटिश संशोधकांनीं सुपरपेनिसिलीन ह्या नव्या औषधाचा शोध लावला आहे. पेनिसिलीन औषधानें जे रोगजंतू मरत नाहींत त्यांचा निकाल लावण्याचें काम नवीन औषध चांगल्या रीतीनें करतें. धोकादायक संसर्गजन्य रोगांचा प्रसार थांबविण्यासाठी त्याचा फार उपयोग होईल. बाळंतिणींच्या दवाखान्यांत तें विशेष उपयुक्त ठरेल.

**कांडला बंदरांतील विजेचें उत्पादन**—गुजरात सरकारनें आपल्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कांडला बंदरांतील वीजकेंद्राचें उत्पादन वाढविण्याची योजना हातीं घेण्याचें ठरविलें आहे. योजना पूर्ण झाल्यावर केंद्रांत १६,००० किलोवॅट वीज निर्माण होईल. योजनेसाठी १ कोटी, २० लाख रुपये खर्च येईल. वीजपुरवठ्याच्या आणखीहि कांहीं योजना आखण्यांत आल्या आहेत.

**भोपाळच्या नबाबांची मालमत्ता**—गेल्या फेब्रुआरी महिन्यांत भोपाळचे नबाब निधन पावले. ह्यांनीं इंग्लंडमध्यें ५ लाख पौंडांची मालमत्ता ठेवली आहे. ह्या मालमत्तेमधून त्यांनीं आपल्या जवळच्या नातलगांची सोय केली. नातलग सोडून त्यांनीं ५ हजार पौंडांच्या देणग्या आपल्या शरीररक्षकांना दिल्या आहेत.

**उत्तरप्रदेशांतील रस्ते**—उत्तरप्रदेशांतील सरहद्दीवरील प्रदेशाचा एक निराळा विभाग बनविण्यांत आला असून त्याच्या विकासासाठी ७ रस्ते बांधण्यांत येणार आहेत. रस्ते बांधण्यासाठी ५ कोटी, ७५ लाख रुपये खर्च येणार आहे. रस्ते बांधण्याच्या खर्चापैकी ७५ टक्के खर्च मध्यवर्ती सरकार सोसणार आहे.

**विजेच्या रेल्वे-एंजिनची खरेदी**—भारतीय रेल्वेसाठी युरोमधील कांहीं कंपन्यांकडून विजेवर चालणारीं १०० रेल्वेएंजिनें खरेदी करण्यांत येणार आहेत. त्याशिवाय १० विजेचीं एंजिनें जपानकडून विकत घेण्यांत येणार आहेत. जागतिक बँकेनें रेल्वेच्या विकासासाठी दिलेल्या कर्जातून ही खरेदी होणार आहे.

**रशिआकडून आणखी कर्ज**—भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मदत म्हणून रशिआकडून आणखी ५० कोटी रुबल्सचें कर्ज मिळणार आहे. रुपयाच्या चलनांत ही रक्कम ६० कोटी रुपये भरते. कर्जाचा उपयोग कशा रीतीनें करावयाचा त्यासंबंधी उभयता सरकारांत लवकरच वाटाघाटी सुरू होतील.

**बँकेतून पैसे काढण्यासाठी गर्दी**—गेल्या आठवड्यांत दिल्ली येथील पंजाब नॅशनल बँकेच्या कांहीं शाखांवर पैसे काढण्यासाठी ठेवीदारांनीं एकच गर्दी केली. त्यामुळें ह्या शाखांतून पैसे देण्याचें काम बऱ्याच उशीरापर्यंत चालू ठेवण्यांत आलें होतें. बँकेनें आपल्या छोट्या खातेदारांना ४ कोटी रुपये परत केले असें म्हणतात.

**आद्य शंकराचार्यांचे ग्रंथ**—आद्य शंकराचार्यांच्या संपूर्ण ग्रंथांच्या आवृत्त्या स्वस्तांईनें प्रसिद्ध करण्यांत याव्या अशी शिफारस मध्यवर्ती संस्कृत बोर्डानें केली आहे. ह्या ग्रंथांत ब्रह्मसूत्रावरील भाष्य, गीता व उपनिषद् हे प्रमुख आहेत. ग्रंथ तीन संडांत प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. महाभारत व रामायण ह्यांच्या सटीक आवृत्त्याहि प्रकाशित होणार आहेत.

**कांगोकडून इस्पितळाची मागणी**—भारत कांगो सरकारला २०० रोग्यांची सोय करणारें इस्पितळ पुरवू शकेल काय, अशी विचारणा कांगो सरकारनें केली आहे. इस्पितळासाठी लागणारा वैद्यकीय नौकरवर्ग व उपकरणें भारतानेंच पुरवावयाचीं आहेत. इस्पितळाचा खर्च संयुक्त राष्ट्रसंघटनेकडून मिळेल अशी अपेक्षा आहे.

**खादी पडून आहे**—केरळ राज्यांतील खादीची विक्री करणाऱ्या निरनिराळ्या संस्थांतून १० लाख रुपये किंमतीचें खादीचें कापड विक्री न झाल्यामुळें पडून आहे. राज्याच्या उद्योगमंत्र्यांनीं सर्व राजकीय पक्षांना खादी खपविण्यासाठी सुरू करण्यांत येणाऱ्या खास मोहिमेला पाठिंबा देण्याची विनंती केली आहे.


**कराचीजवळ हिंदू देऊळ**—पाकिस्तानच्या पुराणवस्तुखात्याला कराचीजवळ जमिनींत गाडलें गेलेलें एक हिंदू देऊळ सांपडलें आहे. देवळाच्या गाभाऱ्यांत चुन्यांत बांधलेलें एक स्थंडिल व दगडाचें शिवलिंग सांपडलें आहे. सिंधू नदीच्या खोऱ्यांतील मुसलमान पूर्व संस्कृतीचा हा अवशेष असावा.

**चीनमध्यें धान्याचें वांटप**—चीनमध्यें कम्युनिस्ट राजवट अधिकारावर आल्याला आतां ११ वर्षे झालीं. येत्या हिंवाळ्यांत चीनमध्यें अन्नधान्याचें कडक रीतीनें वांटप करण्यांत येईल असा संभव दिसत आहे. चीनमधील धान्य बाहेर निर्यात केल्यानें हा प्रसंग आला आहे, असें मत चिनी नागरिक व्यक्त करीत असल्याचें समजतें.

**आणखी उपग्रह सोडणार**—मनुष्याच्या अंतरिक्ष प्रवासांतील बिकट समस्या सोडविण्यासाठी रशिआ आणखी कांहीं उपग्रह सोडणार आहे. रशिआनें नुकत्याच सोडलेल्या उपग्रहांतील कुत्री पृथ्वीवर परत येऊ शकली. ह्या उपग्रहांत मनुष्य पाठविला असता तर तोहि सुखरूप परत आला असतां असें मत रशिअन शास्त्रज्ञांनीं व्यक्त केलें आहे.

**दक्षिण ध्रुव प्रदेशांत तेल ?**—दक्षिण ध्रुव प्रदेशांत छावणी उभारून राहणाऱ्या रशिअन शास्त्रज्ञांनीं एके ठिकाणीं बर्फाखाली ज्वालामुखी असावा असा अंदाज केला आहे. ह्या संभाव्य ज्वालामुखीच्या आसपासच्या भागांत खनिज तेल असण्याची शक्यता आहे. तेलाच्या अस्तित्वाचा थोडाबहुत पुरावा त्यांना मिळाला आहे.


किर्लोस्कर
स्थापना १८८८
पावरवर चालणारा
उंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तीत जास्त उसाचे गाळण करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स, गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटलपासून तयार केलेले असून वर्षानुवर्षे बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी ( द. सातारा )



श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांचे गुजराती अनुवाद

**सुखी जीवननी पगदंडी** ( तिसरी आवृत्ति ) [ कण आणि क्षण ]

**सदाचारने पगले** ( दुसरी आवृत्ति ) [ पुढे पाऊल ]

**मधुमालती** ( छापत आहे ) [ तुमचें स्थान कोणतें ]

# अर्थ

बुधवार, ता. ७ सप्टेंबर, १९६०





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## बँकांच्या रचनेंत सुधारणा आवश्यक

" ज्या बँकांचा कारभार योग्य प्रकारें चालू आहे, अशांच्याकडे एकूण ठेवींपैकी ९०% ठेवी आहेत. पण, भारतांतील ३६३ बँकांत कांहीं कमकुवत बँकाहि आहेत; त्यांचा कारभार इष्ट त्या पातळीपेक्षा कमी पातळीचा आहे आणि पूर्वीं दिलेल्या असुरक्षित व वसुलीस कठीण अशा कर्जांचा दुष्ट वारसा त्यांना सतावीत आहे. म्हणून, आपण सुरक्षिततेच्या कल्पनेखालीं झोपून जातां कामा नये. बँकांच्या रचनेमध्यें सुधारणा करणें आवश्यक झालें आहे. १९५५ मध्यें, भांडवल आणि रिझर्व्ह ह्यांचें ठेवींशीं प्रमाण ७% होतें, तें १९५९ मध्यें ४% वर उतरलें आहे; हें प्रमाण वाढविण्यांत आलें पाहिजे. ह्याचा अर्थ, भांडवलाच्या वाढीबरोबर रिझर्व्हमध्येंहि वाढ घडवून आणायला हवी. कमी भांडवलामुळें, थोड्या लोकांच्या हातीं कारभाराची सत्ता एकवटणें शक्य झालें आहे; त्याचा बारकाईनें विचार होणें आवश्यक झालें आहे. कांहीं कांहीं बँकांतून असें आढळून आलें, कीं एखादें कुटुंब किंवा कांहीं कुटुंबांचे गट ह्यांना त्या बँकांवर सार्वभौम सत्ता चालवितां येते. ह्या सत्तेचा गैरवापर होऊं नये, ह्या दृष्टीनें काय दक्षता घेतली पाहिजे, ह्याचा विचार चालू आहे. नव्यानें विक्रीस काढलेलें भांडवल तरी जुन्या भागीदारांतच वाटलें न जातां, भागीदारांची संख्या विस्तृत व्हावी, अशी योजना करावी लागेल.

" बँकांच्या एकत्रीकरणाचा प्रश्न वाटतो तितका सोपा नाहीं; कारण प्रत्येक बँकेच्या कारभाराची पातळी वेगळी असते आणि त्याचें प्रतिबिंब बँकेच्या येण्या-देण्यांत दिसून येतें. अर्थात, ह्या अडचणीवर कांहींतरी तोड काढायलाच हवी. बदललेल्या परिस्थितीचा विचार करून, बँकिंग कायद्यांत बऱ्याच सुधारणा तातडीनें कराव्या लागतील, असें दिसतें. लायसेन्सला पात्र नसलेल्या शेंकडो बँका दीर्घकाळ अडचणींतच चालू ठेवणें हिंदी बँकिंगच्या दृष्टीनें हितावह नाहीं. "

पलाई बँक बंद पडल्याच्या निमित्तानें रिझर्व्ह बँकेवर जी टीका झाली आणि तिच्यावरील जबाबदारी पार पाडण्यास ती असमर्थ ठरली असा सूर निघाला, त्याचा एक परिणाम म्हणजेच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार ह्यांचें वरील वक्तव्य होय. रिझर्व्ह बँकेचें धोरण कमकुवत बँकांबाबत सहानुभूतीचें होतें; पण त्याचे काय दुष्परिणाम होऊं शकतील ह्याकडे दूरदृष्टीनें पहाण्यांत आलें नव्हतें. मलमपट्टीच्या उपायावर रिझर्व्ह बँक समाधान मानीत आली आणि मूलग्राही उपाय करण्याचें टाळण्यांत आलें. १९५६ मध्यें लिक्विडेशनमध्यें गेलेल्या १९ बँकांत ५५ लक्ष रु. च्या ठेवी होत्या; १९५७ मध्यें २३ लक्ष रु. ठेवींच्या २५ बँका लिक्विडेशनमध्यें गेल्या. १९५८ मध्यें लिक्विडेशनमध्यें गेलेल्या बँकांची संख्या २३ होती व त्यांत १७४ लक्ष रु. च्या ठेवी होत्या. १९५९ मधील तत्सम आंकडे ४३ बँका व १५१ लक्ष रु. च्या ठेवी असे होते. इथपर्यंत ठीक झालें. पण १९६० मध्यें लिक्विडेशनमध्यें गेलेल्या लक्ष्मी बँकेंत आणि पलाई बँकेंत अनुक्रमें सुमारें २½ कोटी रु. व १० कोटी रु. च्या ठेवी होत्या ! त्या धोक्यांत आल्यानंतर आतां एकदम जागृति दिसून येत आहे. खड्ड्यांत पडूं न देणें सोपें आहे, पण रुतलेल्याला बाहेर काढणें अवघड आहे, हें खरें आहे; म्हणूनच रिझर्व्ह बँकेलाहि कठोर उपाय-योजनेचें धारिष्ट्य आजवर झालें नाहीं. नव्या एकाहि बँकेची स्थापना गेल्या कित्येक वर्षांत झाली नाहीं, पण कितीतरी बँका बंद पडणें अटळ झालें, हें त्याचेंच प्रत्यंतर आहे.

---

## बनावट नोटांचा बंदोबस्त

सध्यां चलनांत असलेल्या बनावट नोटांची संख्या फार मोठी आहे अशी धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. अर्थात् अशा नोटा पकडल्यानंतरच त्यांचे नंबर, मूल्य, इत्यादि उघडकीस येत असल्यानें अशा एकूण किती किंमतीच्या, किती नोटा चलनांत आहेत तें शोधून काढणें शक्य नाहीं. देशांत तयार करण्यांत येणाऱ्या बनावट नोटांखेरीज, हा बेकायदेशीर धंदा करणाऱ्या बदमाषांच्या टोळ्या परदेशांतूनहि अशा नोटांची आयात करतात. पकडण्यांत आलेल्या शंभर रुपयांच्या कांहीं बनावट नोटा परदेशाहून आल्याचें दिसतें. या प्रकारास आळा घालण्यासाठी इराणच्या खात्यांतील विभागांत खास नोटा चालू करण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणें प्रत्येक व्यक्तीस ७५ रु. पेक्षा अधिक भारतीय चलनाची आयात करण्यास बंदी घालण्यांत आली आहे. जकात व पोलीस अधिकाऱ्यांस बनावट नोटा शोधून काढण्याचें व बनावट नोटाप्रकरणांची पद्धतशीर चौकशी करण्याचेंहि शिक्षण देण्यांत येतें. या उपाययोजनांमुळें भारतांत शंभर रुपयांच्या बनावट नोटा आणण्याचें प्रमाण बरेंच कमी झालें आहे.

---

## ठेवीदारांप्रमाणें कर्जदारांचाहि विचार व्हायला हवा

पलाई बँकेच्या निमित्तानें लोकसभेंत व राज्यसभेंत जी चर्चा झाली, त्यांतील एका महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. ठेवीदारांना तातडीनें पैसे परत मिळावेत हें योग्य आहे; पण ज्यांनीं बँकेकडून कर्जें घेऊन तीं व्यापारांत व उद्योगधंद्यांत गुंतविलीं, त्यांचा काय विचार ? त्यांनीं एकदम सर्व कर्जांची परतफेड कशी करावयाची ? त्यांच्या व्यवसायाचें काय व्हावयाचें ? तडकाफडकी कर्जें परत मागितलीं, तर कर्जदारांचें दिवाळेंच वाजायचें. त्यांना दुसरें कोण मदत करणार ? सरकार व रिझर्व्ह बँक ह्या प्रश्नाकडे दक्षतेनें लक्ष पुरवील, असें आश्वासन देण्यांत आलें आहे.

---

**विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची संख्या**—दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थीसंघापुढें बोलतांना विद्यापीठ अनुदान-मंडळाचे अध्यक्ष श्री. चिंतामणराव देशमुख म्हणाले कीं, विद्यापीठांतील शिक्षणाचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड कसोशीनें करण्यांत यावी. देशाच्या सध्यांच्या आर्थिक परिस्थितींत, विद्यापीठांत शिकणाऱ्या बऱ्याच विद्यार्थ्यांचा देशाला कांहींच फायदा होत नाहीं, ही गोष्ट हानिकारक आहे.

## खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना भरपूर वाव

टाटा कंपनीचे एक माजी डायरेक्टर व सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. ए. डी. श्रॉफ ह्यांनीं बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्समध्यें बोलतांना सध्यांच्या आर्थिक परिस्थितीविषयीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, सरकारनें आयातींत अधिक कपात करण्याचें ठरविलें आहे. पण ह्यापुढें आयातींत आणखी कपात केल्यानें अर्थव्यवस्थेच्या विकासावर विपरीत परिणाम होईल. इतकेंच नव्हे तर, सध्यां उद्योगधंद्यांतून होणाऱ्या उत्पादनांतहि अडथळे निर्माण होतील. भारताच्या परदेशीय हुंडणावळींच्या साठ्याबाबत गेल्या कांहीं वर्षांत चिंताजनक परिस्थिति निर्माण झाली आहे. परदेशीय चलनाच्या साठ्यापैकी बराच मोठा हिस्सा आतांपर्यंत अन्नधान्याच्या आयातीवर खर्च करण्यांत आला आहे. अमेरिकेनें जर भारताला धान्याची मदत केली नसती तर आज अतिशय वाईट परिस्थितीला तोंड द्यावें लागलें असतें. भारतांत अलीकडे सार्वजनिक मालकीच्या विभागांची बरीच वाढ झालेली आहे. तरी सुद्धां खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना देशांत पुष्कळ वाव आहे. औद्योगीकरणाच्या बाबतींत भारताला अद्याप खूप वाटचाल करावयाची आहे. त्यामुळें खाजगी मालकीच्या उद्योग-धंद्यांना कितीतरी क्षेत्रें उपलब्ध आहेत. कंपन्यांकडून घेण्यांत येणारा कर फार जबर आहे. त्यामुळें उद्योगधंद्यांतून होणारा नफा भांडवलाच्या रूपानें गुंतविण्यास व धंद्यांचें आधुनिकीकरण करण्यास पुरेसा पैसा मिळूं शकत नाहीं. भारतामधील लोकांचें दरडोई उत्पन्न फार अल्प असल्यानें भांडवलाचा संचय मंदगतीनें होणें अपरिहार्यच आहे.

## पश्चिम बंगालमधील तेलाचें संशोधन बंद

पश्चिम बंगालमध्यें स्टँडर्ड व्हॅक्यूम ऑईल कंपनीतर्फे खनिज तेलाचें संशोधन करण्यांत येत होतें. आतां कंपनीनें तेलाचा शोध करण्याचें काम थांबविलें असून आपला निर्णय भारत सरकारला कळविला आहे. ह्यासंबंधीं काढलेल्या पत्रकांत असें म्हटलें आहे कीं, तेलाचा शोध करण्यासाठी कंपनीनें अगदीं पहिल्या प्रतीचे तज्ज्ञ व पहिल्या प्रतीचीं साधनें वापरलेलीं होतीं. भारत सरकार व स्टॅनव्हॅक ह्यांच्या सहकार्यानें शोध करण्याचें काम चालूं होतें. कंपनीनें तेल शोधण्यासाठी आतांपर्यंत १० विहिरी खोदल्या. परंतु त्यापैकी एकांतहि तेलाचा आढळ झाला नाहीं. विहिरी खोदण्याचीं कामें चालूं असतां तेलाच्या अस्तित्वासंबंधीं सांपडलेला पुरावाहि अगदींच निराशाजनक ठरला. त्यामुळें तज्ज्ञांचें मत असें पडलें कीं ह्यापुढें खोदाईवर होणारा खर्च हा अनाठायी ठरण्याचाच अधिक संभव आहे. १९४९ सालापासून स्टॅनव्हॅक कंपनी पश्चिम बंगालमध्यें तेलाच्या शोधाचें काम करीत होती. पहिलीं पांच वर्षे कंपनीनें सर्व काम आपल्याच बळावर चालविलें. ह्या कालांत कंपनीनें तेलाच्या शोधासाठी सुमारें ६४ लाख रुपये खर्च केले आहेत. गेल्या जूनअखेरपर्यंत ह्या कामांत एकूण ७ कोटी ५४ लाख रुपये गुंतविण्यांत आले. त्यापैकी ७५ टक्के खर्च कंपनीनें सोसला असून बाकीचा भारत सरकारनें केला आहे. १९५१ सालीं कंपनीनें पश्चिम बंगालची विमानांच्या साह्यानें चुंबकीय पहाणी केली. १९५७ सालीं खोदाईच्या कामास १० ठिकाणीं प्रारंभ करण्यांत आला. खोदकाम करणाऱ्या यंत्रसामुग्रीनें एकूण ९०,००० फूट खोदाई केली.

## हौशी प्रवाशांकडून मिळणारी प्राप्ति

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारताला परदेशांतून येणाऱ्या हौशी प्रवाशांकडून १५० कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळेल असा अंदाज करण्यांत आला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ह्याच बाबीपासून सुमारें ९० कोटी रुपयांची परदेशीय हुंडणावळ मिळेल. परदेशी चलन मिळविणाऱ्या उद्योग-धंद्यांत १९५९ सालीं ह्या धंद्याचा क्रमांक ६ वा लागला आहे. त्यापूर्वी तो सातवा होता. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या धंद्यासाठी ५०० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या रकमेपैकी ३०५ लाख रुपयांची रक्कम मध्यवर्ती सरकार परदेशीय प्रवाशांसाठी अधिक चांगल्या सुखसोयी निर्माण करण्यासाठी खर्च करणार आहे. देशांतर्गत प्रवासाची हौस भारतामधील लोकांत वाढावी म्हणून १०५ लाख रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत. प्रवाशांसाठी उतरण्याची चांगली सोय करणें, त्यांच्या भोजनाची व्यवस्था करणें, ह्या कामाकडे विशेष लक्ष देण्यांत येणार आहे. प्रवाशांच्या दृष्टीनें प्रेक्षणीय असलेल्या स्थळांना विमान-मार्गानें जोडण्याची योजना आखण्यांत आली आहे. हें साध्य होण्यासाठी इंडिअन एअर लाइन्स कॉर्पोरेशनला आर्थिक मदत देण्यांत येणार आहे. त्याशिवाय परदेशीय प्रवाशांच्या मनो-विनोदनासाठी खास कार्यक्रम ठेवण्याचा सरकारचा विचार आहे. परदेशी पाहुण्यांची जलक्रीडेची हौस भागविण्याची व जलपर्यटन व मच्छीमारी करण्याची सोय करण्यांत येणार आहे. परदेशांतून येणाऱ्या प्रवाशांपैकी ६१ टक्के प्रवासी १९५९ सालीं विमानानें आले होते व २३ टक्के समुद्रमार्गानें आले होते.

## कामगारांना अधिक महत्त्वाचें स्थान द्या

दक्षिण भारतामधील युनायटेड प्लँटर्स असोसिएशन ह्या संघटनेची ६७ वी वार्षिक सभा कुन्नूर येथें भरली होती. ह्या सभेचें उद्घाटन केरळ राज्याचे गव्हर्नर श्री. व्ही. व्ही. गिरी ह्यांनीं केलें. ह्या प्रसंगीं केलेल्या भाषणांत ते म्हणाले कीं भारतांत समाजवादी अर्थ-व्यवस्थेचें ध्येय निश्चित करण्यांत आलें आहे. त्यामुळें समाजाच्या रचनेंत बदल करावा लागणें अपरिहार्यच आहे. ह्या बदलत्या परिस्थितीशीं जुळतें घेण्याचे प्रयत्न देशांतील मालकवर्गानें केले पाहिजेत. निरनिराळ्या धंद्यांच्या व्यवस्थापकीय संघटनेंत कामगारांना अधिक प्रमाणांत सहभागी करून घेण्यांत आले पाहिजे. मालकवर्गानें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं केवळ भांडवलाच्या गुंतवणुकीनें काम भागणार नाहीं. कामगारांनीं जर आपआपलीं कामें केलीं नाहींत तर धंदेच चालणार नाहीं. धंद्यांबाबत कामगारां-चीहि कांहीं जबाबदारी आहे. ती त्यांनीं पाळली पाहिजे. भारताची अर्थव्यवस्था सध्यां विकासाच्या अवस्थेंत आहे. अशा वेळीं कारखानदार आणि कामगार ह्यांच्यांतील संबंध सलोख्याचे असले पाहिजेत. औद्योगिक जीवनांत नुसती शांति असली म्हणजे सलोख्याचे संबंध आहेत असें म्हणतां येणार नाहीं. उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत जीं भांडणें उत्पन्न होतात तीं मिटविण्याकरितां मध्यवर्ती सरकारनें व राज्य सरकारांनीं कायम स्वरूपाची यंत्रणा उभारली पाहिजे. ह्या यंत्रणेच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक मूलभूत धंद्यासाठी एक मंडळ नेमण्यांत यावें. कोणत्याहि धंद्यांत संप अगर टाळेबंदी होऊं घातल्यास ह्या मंडळानें उपाय सुचवावेत.

## रबर, त्याची लागवड आणि उपयोग

सायकलच्या व मोटारीच्या धावा, पावसाळी कोट आणि बूट, गॅसच्या शेगडीला किंवा स्टेथॉस्कोपला लागणाऱ्या नळ्या, छाती शेकण्याची पिशवी, डोक्यावर बर्फ ठेवण्याची पिशवी, स्पंज, शिक्के, चेंडू व बाहुली इत्यादि खेळणीं, यंत्रांचे पट्टे, त्याच्या बैठकी, विजेच्या तारावरील आवरण, रबरी कापड, एक ना दोन हजारों नित्योपयोगी वस्तु रबरापासून बनवितात. आधुनिक जगास रबराच्या निरनिराळ्या तीस हजार वस्तु लागतात, असा अंदाज आहे. अशा या हरकामी रबराची लागवड कशी करतात व त्याचे आणखी काय काय उपयोग होतात याची माहिती आकाशवाणी पुणें केंद्रावरून डॉ. गो. रा. केळकर यांनीं अलीकडेच केलेल्या भाषणांत सांगितली.

आजकाल सर्वसामान्य माणसाच्या जीवनांतसुद्धां अनेक रबरी वस्तु आवश्यक झालेल्या आहेत. दुधाच्या बाटलीचें बूच किंवा रंगीत फुगा यांचे रूपानें बाळपणीं आपला रबराशीं परिचय होतो व तो जन्मभर टिकतो. कारण, मनुष्य कोणत्याहि व्यवसायाचा असो, लेखक असो, चित्रकार असो, सैनिक असो, व्यापारी असो, डॉक्टर असो किंवा खेळाडू असो, त्याला रबरी वस्तूंचा उपयोग कोठें ना कोठें तरी करावा लागतोच. आणि यांत नवल वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. रबराच्या अंगीं अनेक उपयुक्त गुण आहेत. ते लवचीक आहे, स्थितिस्थापक आहे, मऊ आहे, जलाभेद्य आहे, तसेंच विद्युत्‌विरोधीहि आहे. असें हें बहुगुणी आणि अल्पमोली रबर आपणांस एका झाडापासून मिळतें. हें झाड मूळचें दक्षिण अमेरिकेंतील असून, त्यास 'हेविया ब्राझिलिएन्सिस' असें म्हणतात. मनुष्यास रबराच्या वस्तु समाधानकारकपणें बनविणें साधल्यावर रबराची मागणी वाढूं लागली आणि त्याचा पुरवठा हुकमी व्हावा म्हणून जंगलांत इतस्ततः वाढणाऱ्या झाडांऐवजीं त्याची लागवड करण्यांत येऊं लागली. ज्याप्रमाणें भाजीपाला आणि फळफळावळ यांचें उत्पादन करतात, त्याचप्रमाणें रबराचेंहि उत्पादन होऊं लागलें.

### रबराचें झाड

रबराचें झाड उंच व सरळ वाढणारें असून, त्याच्या बुंध्याचा घेर क्वचित् आठ-दहा फुटांइतकाहि असूं शकतो. झाड लावल्यापासून सुमारें ४ वर्षांनीं रबर काढण्यास योग्य होतें. रबर हें या झाडाचा चीक आहे. तो मिळविण्याकरितां झाडाच्या बुंध्याला तिरप्या खांचा पाडतात व त्यांतून दुधासारखा जो चीक निघूं लागतो तो त्या खांचेखाली पेले ठेवून जमा करतात व नंतर एका मध्यवर्ती ठिकाणीं एकत्र करतात. या चिकाला इंग्रजींत 'लॅटेक्स' असें म्हणतात. दुधामध्यें जसें ओषट द्रव्याचे सूक्ष्म कण तरंगत असतात तसेंच लॅटेक्समध्यें रबराचे सूक्ष्मकण तरंगत असतात. लॅटेक्समध्यें रबराचें प्रमाण साधारणपणें ३३ टक्के इतकें असतें. जमविलेला चीक नंतर टिकाऊ बनावितात किंवा त्यांतील जलांश कमी करून तो रवाना करतात. चिकांतील रबर वेगळें काढून व यांत्रिक साहाय्यानें त्याचे तक्ते बनवून ते रवाना करण्याचाहि प्रघात आहे.

### रबराची लागवड कोठें होते !

ईस्ट इंडिज बेटें, मलाया, सिलोन, इंडोचायना व हिंदुस्थान या देशांतच रबराचे सर्व मळे आहेत. ईस्ट इंडिज बेटांत जागतिक उत्पादनाच्या ८० टक्के इतकें रबर उत्पन्न होतें. हिंदुस्थानांतील आपले रबराचे मळे मुख्यतः केरळमध्यें आहेत. त्याशिवाय, कोईमतूर, सालेम, निलगिरी, मदुरा, कूर्ग येथें कांहीं असून कांहीं थोडे आसामांतहि आहेत. हिंदुस्थानांत रबराचें पहिलें रोप इ. स. १८७३ सालीं लावण्यांत आलें. हीच या मळ्यांची सुरुवात म्हणतां येईल. आज या मळ्यांचा विस्तार २३,०८,००० एकर इतका झालेला असून, त्यापासून सुमारें २४,००० टन इतकें रबर निघतें. त्याची किंमत साधारणपणें ८ कोटी, ४७ लक्ष रुपयांच्या घरांत जाईल. एकंदर जागतिक उत्पादनाशीं तुलना केली तर एक टक्क्याहून थोडें जास्त, इतकें हें उत्पादन भरेल. तरीहि त्याचें महत्त्व मात्र कमी नाहीं. कारण, रबरी माल करणारे अनेक लहानमोठे कारखाने हिंदुस्थानांत आहेत. त्यांना हें सर्व उत्पादन उपयोगी पडतें.अलीकडे या कारखान्यांची कच्च्या रबराची गरज वाढूं लागली आहे. यामुळें कांहीं रबर आयात करावें लागतें. हिंदुस्थानांत तयार झालेला रबरी माल इतर देशांना निर्यातहि होतो. तेव्हां राष्ट्राला संपत्ति मिळवून देण्याच्या कामीं रबराचीं बनें फार उपयोगी पडतात यांत संशय नाहीं.

### व्हल्कनायझेशन : रबर टिकाऊ बनविण्याचा प्रयोग

रबर मनुष्यास माहीत झाल्यास जवळ जवळ पांचशें वर्षे होऊन गेलीं. परंतु त्याच्या प्रत्यक्ष उपयोगास सुरुवात सुमारें १८२० पासून झाली. रबराला आज जें महत्त्वाचें स्थान मिळालें आहे तें मात्र एकाएकीं प्राप्त झालेलें नाहीं. त्याकरितां अनेकांचे प्रयत्न कारणीभूत झाले आहेत. त्यांत चार्लस गुडइयर यांचें नांव अग्रभागीं घातलें पाहिजे. यानें लावलेला 'व्हल्कनायझेशनचा' शोध इतका महत्त्वाचा आहे कीं, तो जर लागला नसता तर रबराचा धंदा अस्तित्वांत आलाच नसता. याचें कारण असें कीं, कच्च्या रबराचे गुण टिकाऊ नसतात. ते हवामानाप्रमाणें बदलतात. व्हल्कनायझेशनच्या ह्या महत्त्वाच्या शोधापूर्वी रबराच्या या अस्थिरपणामुळें कित्येक कारखान्यांचीं दिवाळीं निघण्याची पाळी आली. कारण त्याकाळीं बनविलेल्या रबराच्या वस्तु उन्हाळ्यांत मऊ आणि चिकट बनत आणि हिंवाळा आला कीं थंडीमुळें त्या कडक आणि ठिसूळ होत. चार्लस गुडइयरनें रबराच्या गुणांना चिरस्थायी बनविण्याचे प्रयत्न केले. त्यानें जिवापाड मेहनत घेतली, आपल्या जवळ होते नव्हते ते सर्व पैसे खर्च केले; इतकेंच नव्हें तर कर्जाचा भारहि डोक्यावर घेतला. अखेर एक दिवस अचानकपणें उद्दिष्ट साध्य झालें. ही घटना सुद्धां एखाद्या कल्पित कादंबरींत शोभेल अशी विस्मयकारक होती. अनेक प्रयोग करूनहि यश येत नाहीं हें पाहून चार्लस कंटाळला आणि एक त्यानें हातांत असलेलें रबर व गंधक यांचें मिश्रण विस्तवांत भिरकावून दिलें. काय चमत्कार; थोडीशी आंच लागल्यावर एक रासायनिक क्रिया घडून आली आणि तिनें रबराचे गुण स्थिर केले. रबर व गंधक यांच्या मिश्रणापासून बनविलेली रबरी वस्तु उन्हाळा असो कीं हिंवाळा असो. दीर्घकाल जशीच्या तशी राहते असें आढळून आलें. हा शोध १८३९ सालीं लागला व तेव्हांपासूनच रबराच्या धंद्याचा पाया भरभक्कम झाला. रबराची एखादी वस्तु बनवायची झाली कीं तीमध्यें अवश्य ते गुणधर्म यथायोग्य प्रमाणांत यावे म्हणून जी अनेक पदार्थांची रबरांत मिसळ करतात त्या सर्वांत व्हल्कनायझेशन व्हावें म्हणून गंधकाचा समावेश नेहमीं असतो. गंधकाचें प्रमाण जर बरेंच वाढविलें तर एक काळा व टणक पदार्थ बनतो. त्यांस इबोनाइट किंवा व्हल्कनाइट असें म्हणतात. या पदार्थाचाहि उद्योगधंद्यांत अनेक ठिकाणीं उपयोग होतो.

रबराच्या धंद्याच्या वाढीस ज्यांची कल्पनाशक्ति उपयोगी पडली अशी एक प्रमुख व्यक्ति म्हणजे जॉन डनलॉप ही होय. यानेंच पोकळ रबरी धांवा शोधून काढल्या. डनलॉप आयर्लंडमध्यें पशुवैद्यकीचा धंदा करीत असे. धंद्याच्या निमित्तानें त्यास गांवोगांव

हिंडावे लागे व रस्ते खराब असल्यामुळें भरीव रबरी धांवांच्या गाडीनीं प्रवासहि लवकर होत नसे. धांवा पोकळ करून त्यामध्यें हवा भरून त्या वापराव्या अशी कल्पना त्यास सुचली. प्रयोग करून पाहण्याकरितां त्यानें ओवडधोवड रबरी नळ्या बनविल्या व आपल्या मुलाच्या तीनचाकीस त्या बांधून चांचणी घेतली. आपण आज सरसहा वापरतों त्या पोकळ रबरी धांवा प्रचारांत आल्या त्या तेव्हांपासून.

## कृत्रिम रबर

रबर आपल्या बहुमोल गुणामुळें जसें शांततेच्या काळीं उपयोगी पडतें तसेंच युद्धकाळीं उपयोगी पडतें. आधुनिक युद्ध तंत्रामध्यें युद्धसाहित्याची ने-आण करण्याकरितां मालवाहू मोटारगाड्यांना जसें रबर लागतें तसेंच तें रणगाड्यांकरितां, युद्ध-नौकांना, विमानांना, संदेशवाहनांच्या साधनामध्यें विषारी वायूपासून संरक्षण करण्याच्या मुखवट्याकरितां, असे अनेक ठिकाणीं रबर लागतें. या वस्तुस्थितीचा रबरविषयक घडामोडीवर बराच परिणाम झाला आहे. आपण हें पाहिलेंच आहे कीं रबराचे मळे पूर्वेकडील देशांत आहेत. पहिल्या महायुद्धाचे वेळीं जर्मनी व रशिया या राष्ट्रांना रबराचा तुटवडा जाणवूं लागला. कारण रबर उत्पादन करणाऱ्या प्रदेशांवर त्यांची हुकमत नव्हती. तेव्हां त्यांनीं कृत्रिम तऱ्हेनें रबर बनविण्याचे प्रयत्न नेटानें सुरू केले. अलीकडे अमेरिकेनेंहि या प्रयत्नांत बरेंच लक्ष घातलें आहे. दुसऱ्या महायुद्धांत अनेक तऱ्हेचीं कृत्रिम रबरें सिद्ध झालीं असून विशिष्ट ठिकाणीं त्यांचा उपयोग होऊं लागला आहे.

या घटनेमुळें साहजिकच एक प्रश्न आपल्या डोळ्यांपुढें उभा राहतो. तो म्हणजे ज्याप्रमाणें कृत्रिम रंगाचा शोध लागल्यावर भारतांतील नीळ इ. रंगाचा धंदा बसला तसेंच रबराचें होणार काय? परंतु सुदैवानें हा प्रश्न वाटतो तितका भयावह नाहीं. कारण कृत्रिम रबर बनविण्याकरितां लागणारी साधनसामग्री, तज्ज्ञांचें साह्य व तयार होणाऱ्या रबराचे गुणधर्म यांचा विचार केला तर असें दिसतें कीं, कृत्रिम रबरें कांहीं विशेष उपयोगाकरितां जरी रबरापेक्षा सरस असलीं तरी तीं बरींच महागहि आहेत आणि त्यामुळें सर्व ठिकाणीं त्यांचा वापर होणें बरेंच कठीण आहे. याशिवाय दुसरी गोष्ट अशी कीं, रबराचे इतके विविध उपयोग दिवसेंदिवस माहीत होत आहेत कीं, रबराची गरज सारखी वाढतच राहणार आणि मग नैसर्गिक आणि कृत्रिम हीं दोन्हीं रबरें माणसास उपयोगी पडतील. परस्परांमधील स्पर्धेचा प्रश्न अजून कित्येक वर्षें तरी उद्भवणारच नाहीं आणि भारताची समृद्धि साधण्याची कामगिरी आपले प्रयत्नामुळें ते सतत बजावीत राहतील.

---

## प्राइझ-बॉण्डची विक्री

एक एप्रिल, १९६० रोजीं प्राइझ बॉण्डच्या विक्रीस प्रारंभ झाल्यापासून १५ जुलै, १९६० पर्यंत महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांत मिळून सर्वांत जास्त (२,९६,९५,००० रु. चे) प्राइझ बॉण्ड विकले गेले आहेत. त्यानंतर प. बंगाल (१,१७,४५,००० रु.) आणि उत्तर प्रदेश (१,०२,४१,००० रु.) या राज्यांचा क्रम लागतो. या अवधींत एकूण ९,१६,७१,००० रु. किंमतीच्या प्राइझ बॉण्डची विक्री झाली असून, या चार राज्यांचा त्यांत निम्म्याहून अधिक वांटा असल्याचें या आंकडेवारीवरून दिसून येतें.

---

## अकोल्याच्या लक्ष्मी बँकेचा गैरकारभार

### डॉ. गोपाल रेड्डी यांनीं राज्यसभेंत केलेलें निवेदन

मध्यवर्ती महसूल आणि मुलकी खर्चखात्याचे मंत्री डॉ. बी. गोपाल रेड्डी यांनीं राज्यसभेंत अकोला येथील लक्ष्मी बँकेच्या गैरकारभारासंबंधीं पुढील आशयाचें निवेदन केलें.

भारत सरकारच्या सूचनेनुसार रिझर्व्ह बँकेनें अकोला येथील लक्ष्मी बँकेची १९४८ मध्यें प्रथमतः तपासणी केली. त्यानंतर १९५२, ५५ व ५८ मध्येंहि अशा तपासण्या झाल्या होत्या. या तपासण्यांत सदर बँकेच्या कारभारांत कांहीं गैरप्रकार आढळून आल्यानें या बँकेवर कांहीं अटी घालणें, संचालक मंडळाच्या बैठकींत रिझर्व्ह बँकेचा एक अधिकारी उपस्थित ठेवणें, यांसारखे उपाय योजल्यानें तिच्या कारभारांत कांहींशी सुधारणा दिसून आली. तथापि, १९५८ च्या तपासणींत पुनश्च कांहीं गैरप्रकार नजरेस आले. परंतु बँक आपल्या ठेवीदारांचा सर्व पैसा परत करण्याच्या परिस्थितींत होती. फेब्रुवारी, १९५९ मध्यें रिझर्व्ह बँकेनें या बँकेस नवीन सूचना दिल्या व संचालक मंडळाच्या बैठकींत उपस्थित राहण्यासाठी एक अधिकारी पाठविला.

सदर बँकेनें ७५ लाख रुपयांचा गैरवापर केल्याची बातमी महाराष्ट्र पोलिस खात्यानें १८ मे, १९६० रोजीं रिझर्व्ह बँकेला कळवितांच, या बँकेच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें १९ मे रोजीं एक तुकडी तिकडे रवाना केली. या तपासणींत मुंबईसुद्धां सदर बँकेच्या निरनिराळ्या शाखांत ६२-२० लाख रुपयांची तूट असल्याचें आढळून आलें.

दरम्यानच्या काळांत या बँकेंतील ठेवीदारांनीं आपले पैसे काढून घेण्यास सुरवात केली होती आणि मार्च, १९६० अखेर-पर्यंत या बँकेच्या ठेवींत बरीच घट झाली होती. याप्रमाणें २५ मार्च ते २० मे, १९६० पर्यंत ठेवींत ७५ लाख रु. ची घट झाली होती. त्यानंतरहि ठेवीदार आपला पैसा काढून घेत होतेच. हा आंकडा किती ते अजूनहि निश्चित झाले नसले तरी २० मे रोजीं या बँकेची तपासणी सुरू झाल्यापासून या बँकेचा कारभार गुंडाळण्यासाठी कोर्टास अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत ही रक्कम ५० लाख रुपयांपर्यंत गेल्याचा अंदाज आहे. त्यामुळें अर्थातच बँकेंतील रोख रकमेंत बरीच घट झाली होती व बाकीच्या ठेवीदारांचे पैसे ती देऊं शकत नव्हती.

रिझर्व्ह बँकेला या बँकेस मोठ्या प्रमाणावर मदत करतां येणें शक्य नसल्यानें, त्याचप्रमाणें जी मदत करतां येणें शक्य होतें ती अपुरी असल्यानें ३० मे, १९६० रोजीं रिझर्व्ह बँकेनें या बँकेचा कारभार गुंडाळण्याबाबत महाराष्ट्र हायकोर्टाकडे अर्ज केला आणि तो त्याच दिवशीं स्वीकारलाहि गेला. रिझर्व्ह बँकेकडून या बँकेची शेवटची तपासणी चालू असतांना सदर बँकेच्या जनरल मॅनेजरांचा ठावठिकाणा कळूं शकला नाहीं आणि त्यांना शोधून काढण्याचे प्रयत्नहि असफल झाले. कोठल्या परिस्थितींत पैशाचा याप्रमाणें गैरवापर करण्यांत आला त्यासंबंधींचा तपशीलवार अहवाल रिझर्व्ह बँकेनें महाराष्ट्र राज्य पोलिस खात्यास सादर केला. त्याप्रमाणें या बाबतींत पुरेशी आणि तांतडीची उपाययोजना करण्याची आवश्यकताहि पोलिस खात्याच्या नजरेस आणून देण्यांत आली. तदनुसार पोलिसखातें तपास करीत आहे.

या बँकेच्या कारभारावर आतां मुंबईच्या कोर्ट लिक्विडेटर यांचें नियंत्रण असून ठेवीदारांस शक्य तितक्या लवकर त्यांचे पैसे कसे परत करावेत, यासंबंधीं ते विचार करीत आहेत.

---

## राज्य सरकारांची कर्जउभारणी

बारा राज्य सरकारांनीं एकूण ७,५०० लक्ष रु. चे कर्जरोखे २९ ऑगस्ट रोजीं विक्रीस काढले. एकूण ८,५३३ लक्ष रु. च्या रोख्यांस मागणी आली, त्याचा तपशील :—

| | विक्रीस काढलेले (लक्ष रु.) | मागणी (लक्ष रु.) |
|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ९०० | १,३२३ |
| बिहार | ३०० | ३२१ |
| गुजरात | ५०० | ५७७ |
| केरळ | ४०० | ४०८ |
| मध्यप्रदेश | ५०० | ५१६ |
| मद्रास | १,२०० | १,२१८ |
| महाराष्ट्र | १,००० | १,०९८ |
| म्हैसूर | ४०० | ४९१ |
| ओरिसा | ४०० | ४९० |
| राजस्थान | ५०० | ५०५ |
| उत्तर प्रदेश | ७०० | ८८४ |
| प. बंगाल | ७०० | ७०२ |

१९५९मध्यें राज्य सरकारांनीं कर्जउभारणी केली होती, तेव्हां १२ राज्य सरकारांनीं ६१·५ कोटी रु.चे कर्जरोखे विक्रीस काढले होते. त्यावेळीं १०० कोटी रु. च्या रोख्यास मागणी आली होती, आणि बहुतेक कर्जांच्या अर्जदारांना मागणीपेक्षा कमी कर्जरोखे मिळाले. १२ पैकीं ११ राज्य सरकारांना पहिल्या दिवशींच कर्जरोख्यांची विक्री बंद करावी लागली होती. ह्यावर्षी सहा कर्जासाठीं अर्ज स्वीकारणें तीन दिवस चालू ठेवावें लागलें, आणि ७५ कोटी रु. ची मागणी असतांना फक्त ८५ कोटी रु. च्या कर्जासाठींच अर्ज आले. ह्याचा अर्थ, १९५९ च्या मानानें आतांच्या कर्जाचे बाबतींत जनतेचा उत्साह कमी प्रमाणांत दिसून आला. कांहीं राज्य सरकारांनीं कर्जउभारणी यशस्वी व्हावी म्हणून पूर्वतयारी केली होती. बँकांकडे शिलकी पैसा फार मोठ्या प्रमाणावर नसतांनाहि कर्जउभारणी यशस्वी झाली, ही कांहीं कमी महत्त्वाची गोष्ट नाहीं.

## दि बँक ऑफ औंध लि.

दि बँक ऑफ औंध लि. नें तीन-चार वर्षांत विशेष प्रगति केल्याचें दिसून येतें. १९५९ मध्यें बँकेच्या व्यवहारांत सर्वांगीण वाढ होऊन ठेवींत २३/४ लक्ष रु. ची भर पडली आहे; आणि आतां ठेवींची रक्कम सुमारें २० लक्ष रु. झाली आहे. वसूल भांडवल १ लक्ष, ७१ हजार रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ७८,६०० रु. चे आहेत. त्या फंडांत आतां आणखी सुमारें ५ हजारांची भर पडली आहे. बँकेनें १०१/२ लक्ष रु. चीं कर्जें दिलीं असून सरकारी व इतर रोख्यांत ६१/२ लक्ष रु. गुंतले आहेत आणि रोख व बँकांत ५ लक्ष, ६४ हजार रु. राखले आहेत. खेळतें भांडवल २३,३१,००० रु. झालें आहे. १९५९ मध्यें निव्वळ नफा ११,०४६ रु. झाला. बँक ही आतां सरकारी कंपनी असल्यामुळें, भागीदारांनीं नेमलेल्या ऑडिटरांच्या ऑडिटखेरीज मध्यवर्ती सरकारच्या ऑडिटरांकडूनहि बँकेचें दरसाल ऑडिट होतें आणि त्यांचेकडूनहि चोख हिशेबाचा दाखला मिळालेला आहे.

श्री. न. गं. जोशी, बी. ए., एलएल. बी., सातारा, हे बँकेचे चेअरमन असून श्री. बी. डब्ल्यू. घमंडे, डी. कॉम., सी. ए. आय. आय. बी., हे मॅनेजर आहेत. बँकेची मुख्य कचेरी सातारा येथें असून औंध, भवानीनगर व ओगलेवाडी, येथें तिच्या शाखा आहेत.


धी बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

## जाहीर खबर

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ४९ वी वार्षिक साधारण सभा शनिवार, दिनांक २४ सप्टेंबर १९६० रोजीं दुपारीं ३ वाजतां स्टॅं. टा. बँकेच्या रजिस्टर कचेरींत-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

१. ३० जून १९६० रोजीं संपणाऱ्या वर्षाचे हिशेबतपासनिसांनीं तपासलेले ताळेबंद, नफातोटा पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणें.

२. डिव्हिडंडचा दर जाहीर करणें.

३. हिशेबतपासनिसांची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणें.

४. पोट नियम ४७ प्रमाणें निवडलेल्या वं नेमणूक झालेल्या डायरेक्टरांचीं नांवें जाहीर करणें.

५. पोट नियमांत परिशिष्ट 'क' मध्यें दाखविल्याप्रमाणें दुरुस्त्या करणें.

(परिशिष्ट अहवालासह भागिदारांस पाठविले आहे.)

संचालक मंडळाच्या हुकुमावरून,

मुंबई, दि. ३, सप्टेंबर १९६० — मा. ह. मडभडे, मॅनेजर.

भागाच्या तबदिलाचें काम (ट्रान्सफर बुकें) सोमवार, दिनांक १२ सप्टेंबर १९६० ते शनिवार, दिनांक १ आक्टोबर १९६० पर्यंत-दोन्ही दिवस धरून-बंद राहील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यावर दिनांक १०-९-१९६० रोजीं रजिस्टरमध्यें ज्या भागीदारांचीं नांवें दाखल असतील त्यांना सोमवार दिनांक २४-१०-१९६० पासून मुंबई ऑफिसमधून त्यांची डिव्हिडंडची रक्कम दिली जाईल.


## लिक्विडेशनमध्यें गेलेल्या बँकांच्या छोट्या ठेवीदारांची सोय


लोकसभेमध्यें बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल मांडण्यांत आलें आहे. लिक्विडेशनमध्यें गेलेल्या बँकेच्या जिंदगीमधून प्रत्येक सेव्हिंग्ज बँक खातेदाराला अग्रहकानें १०० रु. मिळावेत अशी सध्यांच्या कायद्यांत तरतूद आहे; ही रक्कम आतां वाढवून २५० रु. करण्यांत येणार आहे. अशा रीतीनें रकमा दिल्यानंतर, सेव्हिंग्ज बँक व्यतिरिक्त इतर खातीं असणारांना त्यांच्या ठेवींच्या ५०% रक्कम किंवा २५० रु. (जी रक्कम कमी असेल, ती) मिळण्याची तरतूदहि बिलांत केलेली आहे. अडचणींत असलेल्या बँकांना मोरेटोरिअम देण्याबाबत कायदा सोपा करणें आणि रीकन्स्ट्रक्शन व अमलगमेशनच्या योजना आखून अंमलांत आणणें सोपें करणें, हाहि बिलाचा उद्देश आहे. बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत ४३ अ हें कलम समाविष्ट करण्यांत आलें, त्यावेळेच्या मानानें आतां बाजारभाव वाढले आहेत, म्हणून अग्रहकाची रकमहि वाढवणें जरूर झालें आहे.

## क्यूबामधील रबराचे कारखाने

क्यूबाच्या सरकारनें क्यूबामधील अमेरिकन मालकीचे रबराचे तीन कारखाने आपल्या ताब्यांत घेतले आहेत. क्यूबाच्या सरकारला अडचणींत आणण्यासाठीं ह्या कारखान्यांचे मालक मुद्दाम उत्पादनांत घट करीत आहेत, असा त्यांचेवर सरकारचा आरोप आहे.

**STURDY** *Elegence*

**STABILITY** *Precision*



Great pyramids and sphynx in Egypt are a puzzle to the modern world. They possess incredible intricacy of sturdiness and craftsmanship. They stand centuries together undamaged—Really a wonderful example for sturdiness. As well it is miracleously intricated with craftsmanship. Very few are the examples of such type where sturdiness & elegance go hand in hand.

Similarly in machinery world of today, sturdiness and precision workmanship is well needed. A slightest mistake in designing and workmanship means an immeasurable loss of money, time and work.

*We stand for ....*

- Cams & keys of various types.
- Plastic & Rubber plantation equipment, Extruders, Spreading machines & mixing mills.
- Chemical Engineering equipment, Auto-cloves, pressure-pans, Kiers etc.
- Calenders, Beaters and presses of various types
- Die-punches & moulds.

**For success**



**THE SOUTHERN MACHINE INDUSTRIES**
GULTEKDI ROAD, SWARGATE POONA 2.

Phone : 6640
Gram : 'SOUMACHINE'

Proprietor . SUPANEKAR BROS.

PARKERSON



**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार



**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : - श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.